# दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

**रजिस्टर्ड ऑफिस :** 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, स.नं. १३२/बी, आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, पुणे-४११ ००७.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांकरिता)

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. च्या सभासदांची ११९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता 'सहकार सभागृह', दुसरा मजला, कॉसमॉस टॉवर, प्लॉट नं. ६, स. नं. १३२/बी, आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, पुणे - ४११ ००७** येथे होणार आहे. त्यावेळी पुढील कामकाज होईल. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील विषय :**

**१.** दि. २८ जून २०२४ रोजी झालेल्या ११८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा व दि. ७ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणे, तसेच दि. १५ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या वृत्तांताची नोंद घेणे.

**२.** अ) पुढील प्रस्तावांचा विचार करणे व त्यास मान्यता देणे.
   १. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ चा वार्षिक वृत्तान्त.
   २. दि. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे नफातोटा पत्रक.
   ३. दि. ३१ मार्च २०२५ अखेरचा ताळेबंद.

   ब) २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील गंगाजळी व इतर निधींच्या प्रत्यक्ष वापरासंबंधी माहिती घेणे.

**३.** संचालक मंडळाने सुचविलेल्या २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीसंबंधी विचार करणे व त्यास मान्यता देणे.

**४.** आर्थिक वर्ष २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे.

**५.** बँकेची स्वमालकीची उपकंपनी कॉसमॉस ई सोल्युशन्स अॅन्ड सर्व्हिसेस प्रा. लि. च्या आर्थिक वर्ष २०२४-२०२५ च्या अहवालाचा व आर्थिक आकडेवारीचा आढावा घेणे.

**६.** रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२०२६ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे. तसेच त्यांचे मानधन ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.

**७.** बँकेच्या नावामधील 'दि' हा शब्द वगळण्यासंबंधी विचार करणे व त्यास मान्यता देणे.

**८.** नोएडा येथील सिटीझन को-ऑप बँक लि. या बँकेच्या दि. कॉसमॉस को-ऑप बँक लि. मधील विलीनीकरण योजनेस (Scheme of Amalgamation) मान्यता देणे व रिझर्व्ह बँकेकडे त्यास मान्यता देणेबाबत शिफारस करणे.

**९.** बँकेच्या सध्याच्या पोटनियमांमधील दुरुस्त्यांबाबत संचालक मंडळाने केलेल्या शिफारशींचा (सोबत मसुदा) विचार करणे व त्यास मान्यता देणे. (रिझर्व्ह बँक व सेंट्रल रजिस्ट्रार ऑफ को-ऑप सोसायटीज्, नवी दिल्ली यांचे मंजुरीस अधीन राहून)

**१०.** बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात येणेबाकी असलेल्या कर्जांची माहिती घेणे. (मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटीज् अॅक्ट २००२ कलम ३९(३) अनुसार)

**११.** ११९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती मान्य करणे.

**१२.** मा. अध्यक्ष यांच्या संमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून,

**दिनांक :** २८ जुलै २०२५
पुणे

**सौ. अपेक्षिता ठिपसे**
**व्यवस्थापकीय संचालिका**

### सूचना

**१.** वरील सभेस सकाळी ठीक १०.३० वाजता प्रारंभ होईल. त्यासाठी आवश्यक गणसंख्या पूर्ण झाली नसेल तर ही सभा स्थगित केली जाईल. अशा स्थगित सभेचे कामकाज त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११.०० वाजता सुरू होईल व या स्थगित सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही. या सभेत वरील नोटीशीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.

**२.** सभेच्या विषय पत्रिकेतील विषय क्र. ८ साठी मतपत्रिकांद्वारे मतदान आवश्यक असल्यामुळे बँकेच्या पोटनियमानुसार पात्र असलेल्या सभासदांनाच मतदान करता येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**३.** दि. १९ ऑगस्ट २०२५ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधीची कागदपत्रे बँकेच्या मुख्य कार्यालयात गुरुवार दि. १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत पाहावयास मिळतील.

**४.** वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयांबाबत सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास ते लेखी स्वरूपात बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये गुरुवार दि. १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत आणून द्यावेत, ही विनंती.

**५.** सभेस येताना सभासद ओळखपत्र कृपया जरूर सोबत आणावे. ज्या सभासदांनी असे सभासद ओळखपत्र शाखेकडून अद्याप नेले नसेल, त्यांनी संबंधित शाखेकडे त्यासाठी संपर्क साधावा.

**६.** बँकेचा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठीचा संपूर्ण अहवाल बँकेच्या संकेत स्थळावर (www.cosmosbank.com) उपलब्ध करुन दिला जाईल. तथापि, सभेपूर्वी जे सभासद संपूर्ण अहवाल मिळण्याची लेखी मागणी करतील, त्यांना बँकेचा संपूर्ण अहवाल संबंधित शाखेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.